के.जे.सोमैया मेडिकल कॉलेज, सायन (पूर्व) मुंबई

---

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक. एमईडी १०२०/प्र.क्र.२९४/२०/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- २० जानेवारी,२०२२

वाचा:- १) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एनएमसी/यूजीआय/२०२०/००००७६/००१६४०, दिनांक ०५/०१/२०२२

२) शासन आवश्यकता प्रमाणपत्र समक्रमांक दिनांक २७/११/२०२०

प्रस्तावना:- के.जे.सोमैया मेडिकल ट्रस्टचे के.जे.सोमैया मेडिकल कॉलेज, सोमैया आयुविहार कॉप्लेक्स, सायन, मुंबई या संस्थेतील एम.बी.बी.एस या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक (२) अन्वये आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. तसेच, सदर संस्थेस संदर्भ क्र.१ अन्वये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता उक्त महाविद्यालयातील एम.बी.बी.एस या वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ५० वरुन १०० एवढी वाढ करण्यास मान्यता दिली आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता एम.बी.बी.एस. या वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे **के.जे.सोमैया मेडिकल ट्रस्टचे के.जे.सोमैया मेडिकल कॉलेज, सोमैया आयुविहार कॉप्लेक्स,** सायन (पूर्व), मुंबई या संस्थेस **सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता एम.बी.बी.एस या वैद्यकीय पदवी** अभ्यासक्रमाची **५० वरुन १०० इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ** करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) सदर वैद्यकीय महाविद्यालयातील एम.बी.बी.एस या वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारित केल्यानुसार १००(शंभर) एवढी राहिल.

२) राज्य शासन/केंद्र शासन /मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा तसेच, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल . त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली , महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदीचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प)

N Pradhe
21.1.2022

K. J. SOMAIYA MEDICAL COLLEGE
Sion Mumbai - 400 022
Inward No: 644
Date 21/01/2022

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.

९) संस्थेने कोणत्याही परिस्थितीतं शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

१०) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण , मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

११) सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेली असल्याने संस्थेने पुढील वर्षी विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली/ केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक राहिल.

१२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र .१ वरील पत्रात नमूद अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून प्रस्तुत मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर आदेश केद्र शासनाने संदर्भित केंद्र शासनाच्या दिनांक ०५/०१/२०२२ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुरेन्द्र चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११००११
सचिव,राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, पॉकेट-१४,सेक्टर-८,द्वारका फेस-१,नवी दिल्ली-११००७७
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.
प्राचार्य. के.जे.सोमैया मेडिकल कॉलेज, सोमैया आयुविहार कॉप्लेक्स, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.
निवडनस्ती (शिक्षण-२)